THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY 18TH NOVEMBER 1869.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART X.—Marathi Acts, &c.

### ACT No. XV. of 1869.

इंडियाचे गवरनर जनरल इन्कोन्सिलाच्या खालीं लिहिलेला आक्ट गवरनर जनरल साहेबांनी सन १८६९चे जून महिन्याचे ४ थे तारिखेस मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

### सन १८६९चा आक्ट १५वा.

केद्यांची साक्ष घेण्याचें व त्यांस हजर करण्याचें आणि त्यांवर प्रोसेसी बजाविण्याचें सुलभ पाडण्याबाबद नियम ठरविण्याविषयीं आक्ट.

केद्यांची साक्ष घेण्याचें व त्यांस कोर्टांत हजर करण्याचें आणि त्यांवर प्रोसेसी बजाविण्याचें सुलभ पाडण्याबाबद नियम ठरविणे योग्य आहे यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणे ठरविलें आहे.— उद्देश.

#### १ प्रथमारंभींचे नियम.

१. या आक्टास "सन १८६९चा केद्यांचे साक्षीचा आक्ट" असें नांव दिलें आहे. लहान सरनामा.

२. कलकत्ता व मद्रास व मुंबई येथील इनसाफाचें हे कोर्टांचे असल दिवानी फिर्यादी घेण्याचे मामुल हुकुमतीचे स्थळ,जीसंत स्थापलेलीं लहान दाव्यांचीं कोर्टें आणि त्याच प्रेसिडेन्सी येथील लहान दाव्यांचीं कोर्टें.

पोलीस माजिस्ट्रेट

हद्दींत पोलीस माजिस्ट्रटाचे अधिकार चालविणारे मनुष्यांचीं कोर्टें या आक्टाचे कामासाठीं सदर्हू हे कोर्टाचे ताब्यांतील कोर्टें आहेत असें समजावें.

## २ कैद्यांस आणणें.

या आक्टावरून हुकूम करण्याचा अधिकार फौजदारी कोर्टास आहे.

३. पहिले वर्गाचे ताब्यांतील माजिस्ट्रटाचे कोर्टाहून कनिष्ठ कोर्ट नाहीं असें कोणतेंही फौजदारी कोर्ट हे कोर्ट असेल व अपील घेण्याचे आपले हुकुमतीचे स्थलसीमेंतील कोणतेही तुरुंगांत कैद ठेवलेले मनुष्याची साक्ष अथवा तें फौजदारी कोर्ट हे कोर्ट नसेल तेव्हां तें फौजदारी कोर्ट ज्या हे कोर्टाचे ताब्यांत असेल त्या हे कोर्टाचे अपील घेण्याचे हुकुमतीचे स्थलसीमेंतील कोणतेही तुरुंगांत कैद ठेवलेले मनुष्याची साक्ष त्या फौजदारी कोर्टांत चालू असणारे कोणतेही खटल्यांत अगत्याची आहे असें त्या कोर्टाचे नजरेस येईल अथवा सदर्हू प्रकारचे मनुष्यावर फिर्याद झाली असेल किंवा फिर्याद चालू असेल तर त्या फौजदारी कोर्टास योग्य वाटल्यास त्या कोर्टास खालीं लिहिल्याप्रमाणे करण्याचा अधिकार आहे म्हणजे या आक्टास जोडलेले अ. परिशिष्टांतील किंवा ब. परिशिष्टांतील नमुन्याअन्वयें प्रसंगाप्रमाणें हुकूम सदर्हू तुरुंग स्वाधीन असणारे अमलदारांचे नांवानें करण्याचा अधिकार आहे.

या आक्टावरून हुकूम करण्याचा अधिकार दिवानी कोर्टास आहे.

४. कोणतेंही दिवानी कोर्ट हे कोर्ट असेल व अपील घेण्याचे आपले हुकुमतीचे स्थलसीमेंतील कोणतेही तुरुंगांत कैद ठेवलेले मनुष्याची साक्ष अथवा तें दिवानी कोर्ट हे कोर्ट नसेल तेव्हां तें दिवानी कोर्ट ज्या हे कोर्टाच्या ताब्यांत असेल त्या हे कोर्टाचे अपील घेण्याचे हुकुमतीचे स्थलसीमेंतील कोणतेही तुरुंगांत कैद ठेवलेले मनुष्याची साक्ष त्या दिवानी कोर्टांत चालू असणारे कोणतेही खटल्यांत अगत्याची आहे असें त्या कोर्टाचे नजरेस येईल तर योग्य वाटल्यास खालीं लिहिल्याप्रमाणे करण्याचा अधिकार त्या दिवानी कोर्टास आहे म्हणजे सदर्हू अ. परिशिष्टांतील नमुन्याप्रमाणें हुकूम सदर्हू तुरुंग स्वाधीन असणारे अमलदाराचे नांवानें करण्याचा अधिकार आहे.

कोर्टानें हुकुमावर मखलसी करावी.

५. डिस्ट्रिक्ट जज्जाचे कोर्टाचे ताब्यांतील कोर्टांत अथवा कलकत्ता व मद्रास व मुंबई येथील इनसाफाचे हे कोर्टाचे अवल दिवानी फिर्यादी घेण्याचे मामूल हुकुमतीचे स्थलसीमे बाहेरील कोणतेही लहान दाव्याचे कोर्टांत चालू असणारे कोणतेही दिवानी खटल्यांत सदर्हू प्रकारचा हुकूम केला असेल तेव्हां सदर्हू प्रकारचें लहान दाव्याचें कोर्ट ज्या जज्जाचे किंवा डिस्ट्रिक्ट जज्जाचे हुकुमतीचे स्थलसीमेंत असेल त्या जज्जाकडे किंवा डिस्ट्रिक्ट जज्जाकडे तो हुकूम पाठवून त्यानें त्यावर मखलसी केल्यावांचून तो हुकूम ज्या अमलदाराचे नांवाचा लिहिला असेल त्या अमलदाराकडे पाठवूं नये किंवा त्याणें त्या हुकमाप्रमाणें अमल करूं नये.

हुकूम करणें ज्या घडलेले गोष्टीवरून जरूर झालें त्या गोष्टीच्या तपशील.

सदर्हू प्रमाणें पाठविलेले प्रत्येक हुकमाबरोबर ज्या घडलेले गोष्टीमुळें सदर्हू प्रकारचा हुकूम करणें जज्जाचे मतें अवश्य झाला असेल त्या गोष्टीच्या तपशील त्याचे सहीनिशीं असावा आणि सदर्हू प्रकारचे तपशीलाचा विचार केल्यानंतर त्या हुकमावर मखलशी करण्यास नाहीं म्हणण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट जज्जास आहे.

६. जो मनुष्य हजर होण्यासाठीं या आक्टांत मागें सांगितल्याप्रमाणें हुकूम केला असेल तो मनुष्य हुकूम करणारें कोर्ट किंवा हुकमावर मखलाशी करणारें कोर्ट ज्या डिस्ट्रिक्टांत असेल त्या डिस्ट्रिक्टा शिवाय इतर डिस्ट्रिक्टांत कैद असेल तेव्हां तो हुकूम ज्या कोर्टानें केला असेल त्या कोर्टानें किंवा त्या हुकुमावर ज्या कोर्टानें मखलाशी केली असेल त्या कोर्टानें तो हुकूम सदर्हू मनुष्य ज्या डिस्ट्रिक्टांत किंवा डिस्ट्रिक्टाचे भागांत कैद असेल त्या डिस्ट्रिक्टाचे किंवा डिस्ट्रिक्टाचे त्या भागाचे माजिस्ट्रेटाकडे पाठवावा. आणि सदर्हू प्रकारचे माजिस्ट्रेटानें तो हुकूम ज्या तुरुंगांत सदर्हू प्रकारचा मनुष्य कैद असेल तो तुरुंग स्वाधीन असणारे अमलदारास देववावा.

ज्या डिस्ट्रिक्टांत मनुष्य कैद असेल त्या डिस्ट्रिक्टाचे माजिस्ट्रेटाचे मार्फत हुकूम पाठवावा.

७. कलकत्ता व मद्रास व मुंबई येथील इनसाफाचे हे कोर्टाचे अवल दिवानी फिर्यादी घेण्याचे मामूल हुकुमतीचे स्थल सीमेंतील तुरुंगांत कोणी मनुष्य कैद असेल अथवा हे कोर्टाचे ताब्यांतील ज्या कोर्टास त्याची साक्ष जरूर असेल तें कोर्ट ज्या जागीं भरत असेल त्या जागेपासून शंभर मैलांहून अधिक दूरचे तुरुंगांत जो कैद असेल त्या प्रसंगीं ज्या कोर्टास त्याची साक्ष जरूर असेल त्या कोर्टास सदर्हू प्रमाणें साक्ष देण्यासाठीं त्यास या आक्टाअन्वयें आणणें योग्य आहे असें त्या कोर्टाचे जज्जास किंवा प्रमुख अमलदारास वाटेल आणि ज्या हे कोर्टाचे ताब्यांत तें कोर्ट असेल त्या हे कोर्टाचे अपील घेण्याचे हुकमतीचे स्थल सीमेंत सदर्हू तुरुंग असेल तर त्या जज्जानें किंवा प्रमुख अमलदारानें त्याच हे कोर्टास लेखी दरखास्त करावी आणि त्या हे कोर्टास योग्य वाटेल तर सदर्हू तुरुंग स्वाधीन असणारे अमलदाराचे नावानें सदर्हू अ. परिशिष्टांतील नमुन्या प्रमाणें हुकूम करण्यास तें हे कोर्ट मुखत्यार आहे.

कैदेंतील मनुष्याची साक्ष ज्या जागीं जरूर असेल त्या जागेपासून १०० मैलांहून अधिक अंतरावर तो कैद असेल तेव्हां त्या मनुष्यास नेण्याविषयीं हुकूम हे कोर्टानें करावा.

हुकूम करणारे हे कोर्टानें तो हुकूम ज्या मनुष्याचें नांव हुकुमांत लिहिलेलें असेल तो मनुष्य, ज्या डिस्ट्रिक्टांत किंवा डिस्ट्रिक्टाचे ज्या भागांत कैद असेल त्या डिस्ट्रिक्टाचे किंवा डिस्ट्रिक्टाचे त्या भागाचे माजिस्ट्रेटाकडे पाठवावा. आणि त्या माजिस्ट्रेटानें तो हुकूम सदर्हू प्रकारचा मनुष्य ज्या तुरुंगांत कैद असेल तो तुरुंग स्वाधीन असणारे अमलदारास देववावा.

या कलमाचे आणि तिसरे व चवथे कलमाचे कारणासाठीं ब्रिटिश बरमाचा चीफ कमिशनर हे कोर्ट आहे असें समजावें. सन १८६३ चे २१ वे आक्टाअन्वयें नेमलेले रिकार्डर कोर्ट सदर्हू चीफ कमिशनराचे ताब्यांतील कोर्ट आहे असें समजावें. आणि ब्रिटिश बरमांतील प्रत्येक तुरुंग सदर्हू चीफ कमिशनराचे अपील घेण्याचे हुकुमतीचे स्थल सीमेंतला तुरुंग आहे असें समजावें.

८. हे कोर्टाचे अपील घेण्याचे हुकुमतीचे स्थल सीमे बाहेरील तुरुंगांत कोणी मनुष्य कैद असेल त्या प्रसंगीं त्या कोर्टास किंवा त्या कोर्टाचे ताब्यांतील कोर्टांत फौजदारी खटल्यांत साक्ष देण्यासाठीं त्या मनुष्यास या आक्टान्वयें आणविणें योग्य आहे असें त्या हे कोर्टाचे कोणतेही जज्जास वाटेल, तर सदर्हू तुरुंग ज्या मुलकाचे सरकारचे मुलखांत असेल त्या सरकारास लेखी दरखास्त करण्याचा अधिकार त्या जज्जास आहे आणि आपणास योग्य वाटेल तर खालीं लिहिलेले कानूस अनुसरून सदर्हू प्रकारचे मनुष्यास सदर्हू प्रमाणें नेण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार सदर्हू प्रकारचे सरकारास आहे म्हणजे, सदर्हू प्रकारचे कैद्यां बरोबर

हे कोर्टाचे अपील घेण्याचे हुकुमतीचे हद्दी बाहेर कैद असलेलीं मनुष्यें.

पाहारा देण्याबाबद इंडियाचे गवरनर जनरल इन्‌कौन्सिल वेळोवेळीं ज्या कानूं करतील त्या कानूंस अनुसरून नेण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

ब्रिटिश बरमाचे चीफ कमिशनराचे ताब्यांतील मुलका बाहेरील तुरुंगांत कैद असलेले कोणा मनुष्यास सन १८६३चे सदर्हू २१चे आक्टाअन्वयें नेमलेले रिकार्डर कोर्टांतील कोणतेही फौजदारी खटल्यांत साक्ष देण्यासाठीं नेणे असेल तर या कलमाचे पहिले भागाअन्वयें हे कोर्टाचे जज्जास जो अधिकार दिला आहे तो सदर्हू प्रकारचे रिकार्डरास आहे आणि त्या भागांत इतर ठराव आहेत तेही कारणपरत्वें लागू आहेत.

कैद्यास नेणें.

९. या आक्टाअन्वयें केलेले कोणतेही हुकुमांत ज्या मनुष्याचें नांव लिहिलें असेल तो मनुष्य ज्या तुरुंगांत कैद असेल तो तुरुंग स्वाधीन असणारे अमलदारास तो हुकूम दिल्यावर त्या अमलदाराने तो मनुष्य ज्या कोर्टांत हजर होणें जरूर असेल त्या कोर्टांत हुकुमांत लिहिलेले वेळीं हजर होई असे रीतीने त्यास त्या कोर्टांत नेयवावा. आणि त्याची जबानी घेण्यांत येई तों पर्यंत किंवा ज्या तुरुंगांत तो कैद होता त्या तुरुंगांत त्यास परत नेण्याच्या त्या कोर्टाचा जज्ज किंवा प्रमुख अमलदार हुकूम करी तोंपर्यंत त्यास त्या कोर्टांत किंवा कोर्टा नजीक कैदेंत ठेववावा.

कित्येक कैद्यांस हा आक्ट लागू नाहीं असें ठरविण्याचा सरकारचा अधिकार.

१०. अमुक मनुष्यास किंवा अमुक वर्गाचे मनुष्यांस ज्या तुरुंगांत कैद ठेवलें असेल त्या तुरुंगांतून त्या मनुष्यास किंवा मनुष्यांस नेऊं नये असा हुकूम सरकारी ग्याझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून वेळोवेळीं करण्याचा अधिकार इंडियाचे गवरनर जनरल इन्‌कौन्सिलास किंवा इलाख्याचे सरकारास आहे. आणि तसा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यावर व तो जाहीरनामा अमलांत असेल तो पर्यंत बारावे व तेरावे व चौदावे कलमांतील ठरावाखेरीज या आक्टांतील इतर ठराव सदर्हू प्रकारचे मनुष्यास किंवा सदर्हू प्रकारचे वर्गाचे मनुष्यांस लागू नाहींत असें समजावें.

हुकूम न मानण्यास जेलर केव्हां मुखत्यार आहे.

११. तिसरे कलमाअन्वयें किंवा चवथे कलमाअन्वयें किंवा सातवे कलमाअन्वयें केलेले हुकुमांत ज्या मनुष्याचें नांव लिहिलें असेल तो मनुष्य दुखण्यामुळें किंवा इतर अशक्ततेमुळें नेण्यास योग्य नाहीं असें दिसून येईल तेव्हां ज्या तुरुंगांत तो कैद असेल तो तुरुंग स्वाधीन असणारे अमलदाराने ज्या डिस्ट्रिक्टांत किंवा डिस्ट्रिक्टचे ज्या भागांत तो तुरुंग असेल त्या डिस्ट्रिक्टचे किंवा डिस्ट्रिक्टचे त्या भागाचे माजिस्ट्रेटास लिहून पाठवावें. आणि सदर्हू प्रकारचा मनुष्य अशक्ततेमुळें नेण्यास योग्य नाहीं असें आपलें मत आहे म्हणून सदर्हू प्रकारचा माजिस्ट्रेट आपले सहीनिशीं लेखी ठराव करील तर,

अथवा सदर्हू प्रकारचे कोणतेही हुकुमांत ज्या मनुष्याचें नांव लिहिलें असेल त्या मनुष्यास इनसाफासाठीं कमीट केलेला असेल तेव्हां,-

अथवा इनसाफ होत असतां किंवा प्रथमारंभींची चौकशी होत असतां त्यास तुरुंगांत परत पाठविला असेल तेव्हां,-

अथवा सदर्हू प्रकारचे कोणतेही मनुष्यास या आक्टाअन्वयें नेऊन ज्या तुरुंगांत तो कैद असेल त्या तुरुंगांत त्यास परत आणण्यास जी मुदत लागेल त्या मुदतींतच

त्याची कैदेची मुदत संपणार असेल तेव्हां,

आणि असे प्रत्येक प्रसंगीं तुरुंग स्वाधीन असणारे अमलदाराने सदरहू प्रकारचा हुकूम मान्य करूं नये आणि आपण हुकूम न मानल्याचे कारणाचा तपशील ज्या कोर्टानें तो हुकूम केला असेल त्या कोर्टास त्याणे पाठवावा.

परंतु असें ठरविलें आहे कीं सदरहू अमलदाराने खालीं लिहिलेले प्रसंगीं हुकूम सदरहू प्रमाणे अमान्य करूं नये म्हणजे.

हुकूम तिसरे कलमाअन्वयें केला असेल.

आणि हुकुमांत लिहिलेला मनुष्य इनसाफासाठीं कमिट केलेला असून किंवा इनसाफ होत असतां किंवा प्रथमारंभींची चौकशी होत असतां त्यास तुरुंगांत परत पाठविलेला असून दुखण्यामुळें किंवा इतर अशक्ततेमुळें तो न नेण्या योग्य आहे असें दिसत नसेल.

आणि ज्या जागीं त्याची साक्ष जरूर असेल ती जागा ज्या तुरुंगांत तो कैद असेल त्या तुरुंगापासून पांच मैलांहून अधिक दूर असेल तेव्हां हुकूम सदरहू प्रमाणें अमान्य करूं नये.

## ३ कमिशनें.

१२. कोणतेंही दिवानी कोर्ट हैं कोर्ट असेल आणि त्या कोर्टाचे अपील घेण्याचे हुकुमतीचे स्थल सीमेंतील अथवा तें हैं कोर्ट नसेल तर तें कोर्ट ज्या हैं कोर्टाचे ताब्यांत असेल त्या हैं कोर्टाचे अपील घेण्याचे हुकुमतीचे स्थल सीमेंतील कोणतेही तुरुंगांत कैद असलेला जो मनुष्य दाहावे कलमांत किंवा अकरावे कलमांत सांगितलेल्या कोणतेही कारणामुळें त्या कोर्टापुढें आणतां येत नसेल त्याची साक्ष त्या दिवानी कोर्टास चालू असणारे कोणतेही खटल्यांत मुद्याची आहे असें त्या दिवानी कोर्टाचे नजरेस येईल तेव्हां, कैद्यांची जबानी घेण्याविषयीं कमिशन.

आणि जो तुरुंग सदरहू प्रकारचे जागीं असेल व ज्या जागीं सदरहू प्रकारचें कोर्ट भरत असेल तेथून दाहा मैलांहून अधिक अंतरावर असेल त्या तुरुंगांत कैद असलेले मनुष्याची साक्ष सदरहू प्रकारचे कोणतेही खटल्यांत मुद्याची आहे असें सदरहू प्रकारचे कोर्टाचे नजरेस येईल तेव्हां,

आणि देण्याचे हुकुमावर मखलासी करण्यास डिस्ट्रिक्ट जज्जाने पांचवे कलमाअन्वयें नाहीं म्हटलें असेल तेव्हां,

सदरहू प्रकारचा मनुष्य ज्या तुरुंगांत कैद असेल त्या तुरुंगांत त्याची जबानी घेण्यासाठीं दिवानी इनसाफाचें काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्यांतील ठरावाअन्वयें आपणास योग्य वाटेल तर कमिशन देण्यास कोर्ट मुखत्यार आहे.

१३. कोणतेही हैं कोर्टाचे अपील घेण्याचे हुकुमतीचे स्थल सीमे बाहेरील तुरुंगांत कैद असलेले कोणा मनुष्याची साक्ष त्या हैं कोर्टांत किंवा त्या हैं कोर्टाचे ताब्यांतील कोणतेही कोर्टांत चालू असणारे कोणतेही दिवानी खटल्यांत मुद्याची आहे असें त्या हैं कोर्टाचे नजरेस येईल तेव्हां ज्या तुरुंगांत सदरहू प्रकारचा मनुष्य कैद असेल त्या तुरुंगांत त्याची जबानी घेण्यासाठीं दिवानी इनसाफाचें काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्यांतील ठरावाअन्वयें आपणास योग्य वाटेल तर कमिशन देण्यास तें हैं कोर्ट मुखत्यार आहे. हैं कोर्टाचे अपिलें घेण्याचे हुकुमतीचे हद्दी बाहेरील कैद्यांची जबानी घेण्याविषयीं कमिशन.

१४. बारावे कलमाअन्वयें किंवा तेरावे कलमान्वयें दिलेलें प्रत्येक कमिशन सदरहू कमिशन कोणाचे नांवानें लिहावें.

प्रकारच्या मनुष्य ज्या तुरुंगांत कैद असेल तो तुरुंग ज्या डिस्ट्रिक्टांत असेल त्या डिस्ट्रिक्टचे डिस्ट्रिक्ट कोर्टाचे नांवाने लिहावें. आणि सदर्हू प्रकारचे कोर्टाने तें कमिशन बजावण्याचें काम सदर्हू प्रकारच्या तुरुंग स्वाधीन असणारे अमलदाराकडे किंवा आपणास योग्य वाटेल त्या इतर मनुष्याकडे सोंपावें.

## ४ कैद्यांवर प्रोसेस बजावणें.

कैद्यांवर प्रोसेस कशी बजावावी.

१५. कोणतेही तुरुंगांत कैद असलेले कोणा मनुष्याचे नांवाची प्रोसेस कोणतेही कोर्टाने दिली असेल तेव्हां तो तुरुंग स्वाधीन असणारे अमलदारास ती असल प्रोसेस दाखवून तिची नकल त्याकडे देऊन ठेवली म्हणजे ती बजावली असें समजावें.

बजावलेली प्रोसेस कैद्याचे सांगण्यावरून पाठवावी.

१६. तुरुंग स्वाधीन असणारे ज्या ज्या अमलदारावर पंधराचे कलमांत सांगितल्या प्रमाणें सदर्हू प्रकारची कोणतीही प्रोसेस बजावली असेल त्याणे, ज्या कैद्याचे नांवाची प्रोसेस असेल त्यास सदर्हू प्रमाणें आपणाकडे ठेवलेली प्रोसेसीची नकल होईल तितकी लवकर दाखवून समजवावी. आणि मग त्याणे त्या प्रोसेसीचे पाठीवर खालीं लिहिल्याप्रमाणें दाखला लिहून आपली सही करावी म्हणजे ज्या कैद्याचे नांवाची प्रोसेस आहे तो माझे स्वाधीन असणारे तुरुंगांत कैदी आहे आणि त्यास तिची नकल पोंहचली आहे असा दाखला लिहून सही करावी.

सदर्हू प्रकारचा दाखला सदर्हू प्रकारची प्रोसेस बजाविल्याविषयीं प्रथ-[illegible] इतर कोणा मनुष्यास पाठवावी असें तो कैदी सांगेल व ती त्या प्रमाणें पाठविण्याचा खर्च देईल तर सदर्हू अमलदाराने तिचा लखोटा करून व तो रजिस्टर करून पोष्ट आफिसाचे मार्फत पाठवावा.

## ५ किरकोळ.

खर्च अमानत ठेवणें.

१७. या आक्टांत मागें सांगितलेले कोणतेही ठरावा अन्वयें कोणताही हुकूम कोणतेही दिवाणी खटल्यांत कोर्टाने करणें तो, सदर्हू प्रकारचा हुकूम बजाविण्याचे खर्चाची रकम (ती रकम कोर्टाने ठरवावी) त्या कोर्टांत अमानत ठेवल्या वांचून करूं नये.

परंतु असें ठरविलें आहे कीं सदर्हू प्रकारचा हुकूम होण्याकरितां दरखास्त आल्यावर सदर्हू खर्च अदा करण्या पुरता पैका दरखास्त करणाराजवळ नाहीं असें ज्या कोर्टास ती दरखास्त केली असेल त्या कोर्टाचे नजरेस येईल तर आपले तादीलवार खर्चाकडे लावण्याचे कोणतेही फंडांतून तो खर्च देण्यास कोर्ट मुखत्यार आहे. आणि सदर्हू प्रमाणें खर्च केलेली प्रत्येक रकम ज्या मनुष्यानें द्यावी म्हणून कोर्टाने हुकूम केला असेल त्या मनुष्याकडून सरकाराने ती रकम दिवाणी इनसाफाचें काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्या अन्वयें दाव्याचे खर्चा प्रमाणें वसूल करावी.

कानू करण्याचा अधिकार.

१८. या आक्टास अनुसरून खालीं लिहिलेले गोष्टीबाबद कानू करण्याचा अधिकार इलाक्याचे सरकारास आहे व आठवे कलमा अन्वयें प्रसंग उत्पन्न होतील त्या प्रसंगीं इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिलास आहे.

(१) ज्या कोर्टीत कैदी हजर होणें जरूर असेल त्या कोर्टीत त्यांस नेतां आणतांना त्यांच्या बरोबर पाहारा कितीकसा असावा याबाबद.

(२) सदर्हू पाहाऱ्याचे खर्चाबद्दल किती रकम यावी त्याबाबद; आणि.

(३) ह्या आक्ट अमलांत आणण्यासंबंधीं सर्व कामांत अमलदारांनीं कसी वहिवाट करावी याविषयीं त्यांचे समजूती बाबद कानू करण्याचा अधिकार आहे आणि सदर्हू प्रमाणें केलेल्या कानू वेळोवेळीं फिरविण्याचा व त्यांत मजकूर वाढविण्याचाही अधिकार आहे.

१९. सदर्हू प्रकारच्या सर्व कानू व फेरफार व वाढविलेले मजकूर सरकारी ग्याझेटांत छापून प्रसिद्ध करावे आणि ते प्रसिद्ध केल्याचे तारिखेपासून कायद्याप्रमाणें चालतील असें समजावें. कानू प्रसिद्ध करणें.

२० कोणता अमलदार या आक्टाचे कारणासाठीं तुरुंग स्वाधीन असणारा अमलदार समजावा हें प्रत्येक प्रसंगीं ठरविण्याचाही अधिकार इलाख्याचे सरकारास आहे. तुरुंग स्वाधीन असणारा अमलदार कोण समजावा हें ठरविण्याचा अधिकार.

---

## परिशिष्ट अ.

———— चें कोर्ट.

(येथें तुरुंगाचें नांव लिहावें) स्वाधीन असणारे अमलदार यांस.

———— नांवाचा मनुष्य ———— त हल्लीं कैदी आहे त्यास ———— समक्ष खटला चालू आहे त्यांत (किंवा ———— समक्ष ———— वर फिर्याद झाली आहे त्यांत किंवा जसें असेल तसें लिहावें) साक्ष देण्याकरितां येत्या ———— महिन्याचे ———— तारिखेस ———— वाजतां बंदोबस्तानें तुम्ही हजर केला पाहिजे आणि सदर्हू ———— याणें सांगितल्यानंतर त्यास सदर्हू ———— समक्ष साक्ष दिल्यानंतर किंवा त्यास आणखी हजर होणें जरूर नाहीं असें सदर्हू तुरुंगांत बंदोबस्तानें परत नेयविला पाहिजे.

अ. ब.

तारीख ————

मखलसी.

क. ड.

---

## परिशिष्ट ब.

———— चें कोर्ट.

(येथें तुरुंगाचें नांव लिहावें) स्वाधीन असणारे अमलदार यांस.

———— नांवाचा मनुष्य ———— त हल्लीं कैदी आहे त्यास ———— ज्या समक्ष ———— समक्ष फिर्याद झाली आहे तिचा जाब देण्याकरितां ———— येथें येत्या ———— महिन्याचे ———— तारिखेस प्रातःकाळीं ———— वाजतां बंदोबस्तानें तुम्ही हजर केला पाहिजे. आणि त्या फिर्यादीचा निकाल झाल्यानंतर किंवा त्यास अणखी हजर होणें जरूर नाहीं असें ———— याणें सांगितल्यानंतर त्यास सदर्हू तुरुंगांत बंदोबस्तानें परत नेयविला पाहिजे.

अ. ब.

तारीख ————

मखलसी.

क. ड.

VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.

Printed and Published for Government at the Bombay Education Society's Press, Byculla.

# ACT No XVII. of 1869.

इंडियाचे गवरनर जनरल इन कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट गवरनर जनरल यांणीं सन१८६९ चे आगष्ट महिन्याचे ११ वे तारिखेस मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:-

## सन १८६९चा आक्ट १७वा.

### गलबतावरून माल उतरण्याची मुदत कमी करण्याविषयीं आक्ट.

"माल" (ज्या मालास हें कलम लागू नाहीं त्या माला खेरीज) ज्याणे आणविला असेल किंवा ज्याचा असेल किंवा ज्याकडे आला असेल तो किंवा त्याचा मुखत्यार गलबत नोंदल्या नंतर काम करण्याचे पंधरा दिवसांचे आंत किंवा त्या गलबताचे बिल् आफ् लेडिंगांत जी जास्ती मुदत लिहिली असेल त्या मुदतींत माल न उतरील तर तो माल गलबताचे मास्तराने किंवा कम्यांडराने मांडवींत न्यावा अथवा मास्तराचे अथवा कम्यांडराचे अर्जीवरून जकातीचें अमलदारांनी मांडवींत न्यावा असा ठराव "जकातीचे सर्व कायदे एकत्र करून केलेला आक्ट" म्हणून सन१८६३ चा ६ वा आक्ट आहे त्याचे बावन्नावे कलमांत आहे यास्तव; आणि काम करण्याचे पंधरा दिवसांचे मुदतीची सदर्हू प्रमाणें ठयता केली आहे ती मुदत कमी करणें योग्य आहे यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणें ठरविलें आहे:-- उद्देश.

१. सदर्हू आक्टाचें ५२ वें व ५३ वें व ५४ वें कलम या कलमावरून रद्द केलें असे आणि त्यांचे बदला खालीं लिहिलेलीं कलमें दाखल करावीं:-- सन१८६३ चे ६वे आक्टाचे ५२वे व ५३ वे व ५४ वे कलमां बद्दल नवीं कलमें दाखल केलीं तीं.

"५२. जो माल उतरण्याचा नाहीं म्हणून मास्तराने किंवा कम्यांडराने इकरार केला असेल त्या खेरीज इतर माल ज्याणे आणविला असेल किंवा ज्याचा असेल किंवा ज्याकडे आला असेल तो किंवा त्याचा मुखत्यार गलबत नोंदल्यानंतर काम करण्याचे पराकाष्ठा पंधरा दिवसांची जी मुदत इलाक्याचें सरकार सरकारी ग्याझेटांत वेळोवेळां जाहीरनामा प्रसिद्ध करून ठरवील त्या मुदतींत किंवा त्या गलबताचे बिल् आफ् लेडिंगांत जी जास्ती मुदत लिहिली असेल त्या मुदतींत माल न उतरील तर. ठरविलेले मुदतींत माल न उतरला तर काय करावें.

तो माल गलबताचे मास्तराने किंवा कम्यांडराने मांडवींत न्यावा अथवा मास्तराचे किंवा कम्यांडराचे अर्जीवरून जकातीचे अमलदारांनी मांडवींत न्यावा.

मग मांडवी स्वाधीन असणारे अमलदाराने तो माल स्वाधीन घेऊन त्या मालाबद्दल पावती द्यावी.

आणि मालावर नोरा[1] बद्दल किंवा प्रैमेज[2] बद्दल किंवा जनरल आवरेज बद्दल किंवा नियमित रकमेचे इतर खर्चा बद्दल दावा आहे त्या दाव्याचा फडशा होई तों

---

टीप.-- १. गलबताचे खलाशांस व मास्तरास मालाची भरणावळ देतात ती.

" २. गलबतास तुफान लागल्यामुळें गलबतास व त्यांतील मालास नुकसानी झाली असेल तिची वर्गणी ज्यांचा माल गलबतावर असतो त्यांचे माला प्रमाणें त्यांच्यावर घालतात ती.

पर्यंत तो माल राहूं द्यावा अशी लेखी सूचना दिली असेल तर सदहू खर्च देण्यांत येई तों पर्यंत तो माल त्याणें अटकवून ठेवावा.

आणि थोडका माल खेरीज करून बाकी सर्व माल मुदतींत उतरला तर.

"५३. कोणतेही गलबतांतले मालापैकीं थोडका मात्र खेरीज करून बाकीचा सर्व माल सदहू प्रमाणें ठरविलेले मुदतींत किंवा बिल आफ लेडिंगांत जी जास्ती मुदत लिहिली असेल त्या मुदतींत उतरला असेल तर त्या गलबताचे मास्तरानें किंवा कम्यांडरानें अर्जी केली असतां तो राहिलेला माल तात्काळ मांडवींत नेण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार जकातीचे अमलदारास आहे.

बिल आफ लेडिंगांत लिहिलेले मुदतींत माल न उतरला तर त्याचा परिणाम.

"५४. गलबतांतला माल किंवा त्याचा कोणताही भाग उतरण्यासाठीं जी मुदत बिल आफ लेडिंगांत लिहिली असेल ती काम करण्याचे दिवसांचे सदहू प्रमाणें ठरविलेले मुदतीहून कमी असेल आणि माल ज्याणें आणविला असेल किंवा ज्याचा असेल किंवा ज्याकडे आला असेल तो अथवा त्याचा मुखत्यार सदहू प्रमाणें ठरविलेले मुदतींत माल न उतरील तर तो माल गलबताचे मास्तरानें किंवा कम्यांडरानें मांडवींत न्यावा अथवा मास्तराचे किंवा कम्यांडराचे अर्जीवरून जकातीचे अमलदारांनी मांडवींत न्यावा.

मग मांडवी स्वाधीन असणारे अमलदारानें तो माल स्वाधीन घेऊन त्या माला बद्दल पावती द्यावी.

आणि मालावर नोरा बद्दल किंवा प्रेमेज बद्दल किंवा जनरल आवरेज बद्दल किंवा नियमित रकमेचे इतर खर्चा बद्दल दावा आहे त्या दाव्याचा फडशा होई तों पर्यंत तो माल राहूं द्यावा अशी लेखी सूचना दिली असली तर सदहू खर्च देण्यांत येई तों पर्यंत तो माल त्याणें अटकवून ठेवावा.

हा आक्ट सन १८६३ चे ६ वे आक्टाचा भाग आहे असें समजावें.

२. हा आक्ट "जकातीचे सर्व कायदे एकत्र करून केलेले आक्टाचा" भाग आहे असें समजून याचा अर्थ करावा.

(True Translation.)

VENAYEK WASSOODEW,

Oriental Translator to Government.

Printed and Published for Government at the Bombay Education Society's Press, Byculla.

Forwarded for the perusal of
The 1st Assistant Collector Poona
The 2d Assistant Collector Poona
The Assistant Collector Mr Crowe
The Civil Surgeon Poona
The Mamlutdar Kheid
The Mamlutdar Seeroor
The Mamlutdar Indapoor &
The Mamlutdar Poorundhur
the last officer will be good enough to return it for record. —

Poona Collector's office
27th November 1839

[illegible]
Dy Collector

[illegible]